# सखे Lyrics in Marathi

धडधड काळजात वाढली तुझ्यामुळे सखे
बघ बघ काळ वेळ भासती तुझ्यामुळे मुके

कण कण श्वास हा रुणझुण नादला
हा जीव वाहिला प्रेमाला तुझ्या
कण कण श्वास हा रुणझुण नादला
हा जीव वाहिला प्रेमाला

बहरला प्रीतीचा हा मोगरा
चांदणे उन्हातले तुझ्यामुळे
स्वप्न हे मनातले तुझ्यामुळे
सोबतीस सावली तुझी सखे
मी तुला नि तू मला सखे

आज या मुखावरी सखे नूर वेगळा
शब्द तेच ते जुने सखे सूर आगळा

का मी धडपडतो का मी बावरतो का मी गहिवरतो का
दे या डोळ्यांना दे या श्वासांना साथ हातांना या

क्षण क्षण आपला जणु सण जाहला
वरवर चालला प्रेमाचा झुला
बघ झंकारली हृदयी तार गं
पडघम वाजला सौख्याचा

बहरला प्रीतीचा हा मोगरा
चांदणे उन्हातले तुझ्यामुळे
स्वप्न हे मनातले तुझ्यामुळे
सोबतीस सावली तुझी सखे
मी तुला नि तू मला सखे

Bharatlyrics.com

*More Lyrics from* *Saregama Marathi*